## महाराष्ट्र शासन
## महिला व बाल विकास विभाग

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व सुधारीत अधिनियम 2021 महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील नियम ९० (१) (३) मध्ये निवड समिती गठित करण्याची तरतूद आहे. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ च्या नियम ९० च्या अधिन राहून राज्यस्तरीय निवड समिती सदस्य यांची नियुक्ती करण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

**राज्यस्तरीय निवड समिती**

सदस्य पदाकरिता एकूण ४ पदे

**उपरोक्त पदाबाबतचे पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत त्याचप्रमाणे सदरची व्यक्ती खालील क्षेत्रातील नामांकित, कार्यक्षम व अनुभवी असावी.**

१. बालकांची काळजी घेणा-या संस्था किंवा व्यवस्थापनाशी सबंधित नसलेली आणि किमान सात वर्ष इतक्या कालावधीसाठी अनुक्रमे बाल विकास किंवा बाल संरक्षण क्षेत्रामध्ये काम करणा-या दोन वेगवेगळ्या नामांकित अशासकीय संस्थाचे दोन प्रतिनिधी.

२. किमान सात वर्ष इतक्या कालावधीसाठी बालकांच्या प्रश्नावर काम करणारे किंवा तसे विशेष ज्ञान असणारे प्राधान्याने सामाजिक कार्य, मानसशास्त्र, समाजशास्त्र, बालविकास, आरोग्य शिक्षण, कायदा, या विद्या शाखेचे शैक्षणिक संस्थांमधिल किंवा विद्यापीठांमधील दोन प्रतिनिधी.

३. राज्य निवड समिती महाराष्ट्र राज्य शासनाच्या बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ च्या नियम ९१ अन्वये कामकाज पाहील.

४. निवड समिती सदस्य पदासाठी नामांकने अंतिम करताना संबधित उमेदवाराचा पोलीसांमार्फत केलेला चारित्र्य पडताळणी अहवाल सादर करणे आवश्यक राहीले.

वर नमुद केलेल्या पदांसाठी दिलेल्या अटींची पुर्तता करणाऱ्या इच्छूक व्यक्तीनी आपले खालील विहित नमुन्यातील अर्ज वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि इतर तत्सम कागदपत्रासह जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५, दिवसाचे आत आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, २८ राणीचा बाग, जुन्या सकीट हाऊस जवळ, पुणे- १ यांच्या कार्यालयात सादर करावेत.

तसेच सदरची जाहिरात शासनाच्या www.maharashtra.gov.in.व www.wcdcommpune.com या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे

(डॉ. प्रशांत नारनवरे) भा.प्र.से.
आयुक्त
महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य,पुणे१-

**महाराष्ट्र राज्यातील निवड समिती सदस्य या पदावर नियुक्ती करणेबाबत इच्छूक व्यक्तींची नामनिर्देशन करण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज**

---

१. नाव

२. जन्मतारीख (वय)

३. पत्ता, दुरध्वनी / मोबाईल क्रमांक / ई-मेल आय डी,

४. कोणत्या पदासाठी अर्ज करण्यात येत आहे (सदस्य)

५. शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | वर्ष | विद्यापीठाचे नाव | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

६. शिक्षण, आरोग्य व कल्याण कार्याचा क्षेत्रातील बालकांसोबत काम करण्याचा अनुभव

| अ.क्र. | अनुभव :- शिक्षण, आरोग्य व कल्याणकारी क्षेत्रातील (बालकांशी निगडित कार्याचा कालावधी) | कार्यालयाचे नाव | यंत्रणेचे नाव | पदाचे नाव | थोडक्यात कार्य |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

७. नोकरी / व्यवसायाबाबत तपशील कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक

८. अर्जदार व्यक्तीचे निवड समिती वर काम करण्यासाठीचे संमतीपत्र

९. अर्जदाराची इतर कोणत्याही समितीवर नियुक्ती झालेली आहे काय ? असल्यास तपशील.

**आपला विश्वासू ,**

**(स्वाक्षरी संपूर्ण नाव व पत्ता)**